# Pimpri Chinchwad Police Commissionerate

## प्रेस नोट दि २६/१२/२०१९

### वाहनचोरी करणा-या ०२ विधी संघर्षग्रस्त बालकांकडुन १,७२,०००/- रु कि च्या ०५ दुचाकी हस्तगत

वाकड पोलीस स्टेशन हद्दीत वाढलेल्या वाहनचोरीच्या गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस स्टेशन यांनी तपास पथकातील सपोनि श्री. हरिश माने व पोउनि श्री सिद्धनाथ बाबर यांना वाहनचोरीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत सुचना दिल्या. त्या प्रमाणे ज्या ज्या भागात वाहन चोरीच्या घटना घडल्या त्या त्या भागातील वाहन चो-या झालेल्या ठिकाणचे सीसीटीव्ही फुटेज चेक करणेकरिता तपास पथकाच्या ०३ टिम करुन सीसीटीव्ही फुटेज चेक करणेबाबत सुचना दिल्या. त्या प्रमाणे सीसीटीव्ही फुटेज चेक करीत असताना वाकड पोलीस स्टेशन कडील सराईत विधी संघर्षग्रस्त बालक व त्या सोबत एक मुलगा हे वाहन चोरीचे ठिकाणी संशयितरित्या वावरत असताना दिसले. तपास पथकातील पोहवा. बापुसाहेब धुमाळ व पोशि. प्रशांत गिलबिले यांना बामतीदारमार्फत बातमी मिळाली कि, सदर सीसीटीव्ही मधील संशयित दोन्ही विधी संघर्षग्रस्त बालक हे धनेश्र्वर पुलाजवळ थेरगाव येथे थांबले आहेत. सदर ठिकाणाहुन नमुद दोन्ही विधी संघर्षग्रस्त बालक यांना ताब्यात घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता त्या दोघांनी वाकड पोलीस स्टेशन हद्दीतुन एकुण ०४ दुचाकी तसेच देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीतुन ०१ दुचाकी अश्या एकुण ०५ दुचाकी चोरी केल्याचे कबुल केले. त्यांचेकडुन एकुण १,७२,०००/- रु कि च्या ०५ दुचाकी हस्तगत करण्यात आल्या आहेत. नमुद सराईत विधी संघर्षग्रस्त बालक याचेवर यापुर्वी एकुण ११ गुन्हे दाखल आहेत.

नमुद आरोपीकडुन खालील गुन्हे उघडकिस आणण्यात आले आहेत.

१) वाकड पो.स्टे. गु.र.नं. ११७३/२०१९ भादवि कलम ३७९, ३४ ( शाईन )

२) वाकड पो.स्टे. गु.र.नं. ११२८/२०१९ भादवि कलम ३७९ ( स्कुटी )

३) वाकड पो.स्टे. गु.र.नं. १२११/२०१९ भादवि कलम ३७९ ( स्प्लेंडर )

४) वाकड पो.स्टे. गु.र.नं. ११८८/२०१९ भादवि कलम ३७९ ( पल्सर )

५) देहुरोड पो.स्टे. गु.र.नं. १३०५/२०१९ भादवि कलम ३७९ ( पॅशन )

सदरची कारवाई पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे मा. श्री. संदीप बिष्णोई सो. पोलीस आयुक्त, मा. प्रकाश मुत्याल सो, सह पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो. अपर पोलीस आयुक्त, मा. विनायक ढाकणे सो, पोलीस उप आयुक्त, परी-२, मा. श्री. श्रीकांत मोहीते सो. सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सतिश माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पोलीस स्टेशन. श्री राजकुमार राजमाने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) तपास पथकातील अधिकारी श्री हरिश माने, सहा. पोलीस निरीक्षक, श्री सिद्धनाथ बाबर, पोलीस उप निरीक्षक, व तपास पथकातील पोलीस कर्मचारी - बापुसाहेब धुमाळ, बिभीषन कन्हेरकर, प्रशांत गिलबिले, विक्रम जगदाळे, नितीन ढोरजे, दिपक भोसले, जावेद पठाण, रमेश गायकवाड, विजय गंभीरे, प्रमोद कदम शाम बाबा, विक्रम कुदळ, नितीन गेंगजे, प्रमोद भांडवलकर, सुरेश भोसले तात्यासाहेब शिंदे सचिन नरुटे, सुरज सुतार यांनी केली.


वाकड पोलिस स्टेशन
पिंपरी चिंचवड